# अमर हिंद मंडळ, दादर

## (स्थापना : २६ जानेवारी १९४७)

(सार्वजनिक विश्वस्त नोंद क्रमांक एफ ४३ (मुंबई) संस्था विधी नोंद क्रमांक १७८६/२५-६-१९४९)

**प्लास्टिक पिशवीचा वापर टाळा .... प्रदुषणास घाला आळा.**



फक्त सभासदांसाठी

# ६३ वा वार्षिक अहवाल २००९-१०

अमरवाडी, गोखले पथ (उत्तर), दादर, मुंबई-४०० ०२८.
दूरध्वनी : २४२२ ३५ ८९, २४२१ ९० ११

# भारतीय स्वातंत्र्याचा ६३ वा वर्धापनदिन सोहळा

## रविवार, दि. १५ ऑगस्ट २०१० सकाळी ८.३० वाजता



## मा. श्री. वसंतराव भालेकर

अमर हिंद मंडळाचे अध्यक्ष मा. श्री. वसंतराव भालेकर यांचे शुभहस्ते होणार आहे. मा. श्री. वसंतराव भालेकर ज्येष्ठ क्रीडा पत्रकार, अनेक समाजसेवी संस्थांमध्ये कार्यरत असून क्रीडा विश्व या मासिकाचे संपादक आहेत.

मंडळाचे माजी अध्यक्ष कै. म. ज. फडके यांच्या स्मरणार्थ खेळाडू, कलाकार यांचा प्रतिवर्षी गुणगौरव करण्यात येतो. हा गुणगौरव सोहळा ध्वजारोहणाच्या कार्यक्रमानंतर मा. श्री. वसंतराव भालेकर यांचे हस्ते संपन्न होणार आहे.

ध्वजारोहण, गुणगौरव कार्यक्रमाला सर्वांनी ठिक ८.३० वाजता उपस्थित रहावे.

# अमर हिंद मंडळ, दादर

## १ एप्रिल २००९ ते ३१ मार्च २०१०

### ❖ विश्वस्त ❖

श्री. दिनकर पाटील — ॲड. मुकुंद तिवरेकर

श्रीमती उषा मेहता

| | | |
|---|---|---|
| अध्यक्ष | : | श्री. वसंत भालेकर |
| उपाध्यक्ष | : | श्री. रमेश वरळीकर |
| | | श्री. भास्कर सावंत |

### ❖ कार्यकारी समिती ❖

| | | |
|---|---|---|
| कार्याध्यक्ष | : | श्री. चिंतामणी नागले |
| कार्योपाध्यक्ष | : | श्री. दीपक पडते |
| कार्यवाह | : | श्री. अरुण देशपांडे |
| सहकार्यवाह | : | श्री. सतीश रेडीज |
| कोषाध्यक्ष | : | श्री. श्रीकृष्ण राणे |
| सदस्य | : | श्री. संजय पेडणेकर |
| | | श्री. विजय राणे |
| | | श्री. दत्ता सावंत |
| | | श्री. प्रफुल्ल पाटील |
| | | श्रीमती नीलिमा पालकर |
| | | श्रीमती सीमा कोल्हटकर |
| सदस्य (स्वीकृत) | : | श्री. दीपक नाडकर्णी |
| | | श्री. विलास कारेकर |

# अमर हिंद मंडळ, दादर

## मुंबई - ४०० ०२८.

## वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना

अमर हिंद मंडळाची वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार, दि. १/०८/२०१० रोजी संध्याकाळी ५.०० वा. मंडळाच्या सभागृहात संस्थेचे अध्यक्ष मा. श्री. वसंत भालेकर यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आलेली आहे. तरी सर्व सभासदांनी वेळेवर उपस्थित रहावे, ही विनंती.

***सभेपुढील कामे :-***

१. मागील वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून मंजूर करणे.
२. सन २००९–२०१० सालचा वार्षिक अहवाल मंजूर करणे.
३. सन २००९–२०१० सालचा हिशेब व ताळेबंद मंजूर करणे.
४. सन २०१०–२०११ साठी हिशेब तपासनीस नेमणे व त्यांचे मानधन ठरविणे.
५. सन २०१०– २०११ चे अंदाजपत्रक मंजूर करणे. (परिशिष्ट ब)
६. निधीत रक्कम वर्ग करण्याबाबत ठराव मंजूर करणे.
७. मंडळाचे कार्यक्षेत्र वाढविण्यासाठी मालमत्ता खरेदी करणेस मंजूरी देणे.
८. मा. अध्यक्षांच्या परवानगीने सभेपुढे येणाऱ्या अन्य विषयांवर विचार करणे.

दि. २९/६/२०१० कार्यकारी समितीच्या अनुमतीने

***अरुण अ. देशपांडे***
कार्यवाह

---

सूचना :-

१) गणपूर्तीचे अभावी नियोजितवेळी सभा सुरु न झाल्यास सभा स्थगित करण्यात येईल, ही स्थगित सभा त्याच ठिकाणी ५.३० वा. भरेल व ही सभा पूर्णपणे वैध असेल.

२) सभासदांना अहवाल, हिशेब, अंदाजपत्रक, संस्थेच्या कामकाजासंबंधी सभेत प्रश्न विचारावयाचे असल्यास त्यांनी मंडळाच्या कार्यालयात लेखी स्वरुपात गुरुवार, दि. २९ जुलै २०१० पर्यंत सायं. ६ ते ८ या वेळेत (रविवारव्यतिरिक्त) सादर करावेत.

३) सभासदांनी आपले बदललेले पत्ते त्वरीत कळवावेत तसेच हयात नसलेल्या सभासदांच्या संबंधितांनी तत्सबंधीची माहिती कार्यालयात कळविण्याची कृपा करावी.

४) सर्वसाधारण सभेसाठी येताना कृपया हा अहवाल सोबत घेऊन यावा.

# वार्षिक अहवाल
## (१ एप्रिल २००९ ते ३१ मार्च २०१०)

सन्माननीय सभासद बंधुभगिनींनो,

सादर वन्दे,

मंडळाची वार्षिक अहवाल जमाखर्च आणि ताळेबंद पत्रके आपणाला सादर करताना कार्यकारी समितीस आनंद होत आहे.

दि. २६ जानेवारी २०१० रोजी मंडळाच्या स्थापनेला ६३ वर्ष पूर्ण झाली. अहवाल काळात मंडळाने अनेक सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक क्रीडाविषयक उपक्रम, कार्यक्रम आयोजित केले.

मंडळाच्या क्रीडा विभागाने अनेक स्पर्धांमध्ये भाग घेतला. तसेच प्रथमच मॅटवर खेळवली जाणारी जिल्हास्तरीय कबड्डी स्पर्धा दि. २२ ते २५ मे २००९ या कालावधीत व लंगडी, खोखो व कबड्डी या खेळांच्या आंतर शालेय स्पर्धा दि. ८ ते ११ फेब्रुवारी २०१० रोजी मंडळाच्या क्रींडागणावर घेण्यात आल्या.

मंडळाच्या कलाविभागाने अनेक स्पर्धांमध्ये सहभागी होण्याबरोबरच मंडळाचे अनेक कार्यक्रम ही यशस्वीपणे आयोजित केले. कलाविभागाने कार्यकारी मंडळासाठी आयोजित केलेले *विचार मंथन शिबीर, बालनाट्य, महाविद्यालयीन विद्यार्थ्यांची वक्तृत्व स्पर्धा* यामुळे मंडळाला केंद्र स्थानी धरुन सुयोग्यपणे कार्य करण्यासाठी नवी दिशा मिळाली. त्याच बरोबर रंगकर्मीसाठीची *सांस्कृतिक अमावस्या*, तर एकांकिका स्पर्धामध्ये मानाचे स्थान मिळविलेल्या *कै. आबा पडते राज्यस्तरीय एकांकिका स्पर्धा*, यामुळे मंडळाने समाजसेवी कार्यामध्ये आपला ठसा कायम ठेवला.

मंडळ आपल्या परंपरेला साजेसे कार्य करीत आहे.

**मंडळाचा वार्षिक अहवाल पुढील प्रमाणे :-**

***सभा :-*** अहवाल कालावधीत समितीच्या ११ सभा झाल्या तर कार्यकारी समिती आणि विश्वस्त यांच्या ०३ संयुक्त सभा झाल्या (कार्यकारी समिती सभा उपस्थितीसाठी परिशिष्ट अ पहावे.)
संयुक्त सभामध्ये विश्वस्त, अध्यक्ष, उपाध्यक्ष यांनी कार्य, कार्यक्रम, उपक्रम या संबंधी उपयुक्त असे मार्गदर्शन दिले.

***मंडळाची वार्षिक सर्वसाधारण सभा :-*** मंडळाची वार्षिक सर्वसाधारण सभा शनिवार, दि. १५ ऑगस्ट २००९ रोजी संपन्न झाली. या सभेस एकूण ५१ तहहयात सभासद उपस्थित होते.

***तहहयात सभासद :-*** अहवाल काळात नवीन तहहयात सभासद करुन घेण्यात आले नाहीत. मंडळाचे एकूण तहहयात सभासद ४५५ असून पैकी ७० सभासदांशी मंडळाचा कोणत्याही प्रकारचा संपर्क होऊ शकला नाही.

***विगतवारी निधी*** **:-** अहवाल काळात क्रीडा निधीत ७,५०,०००/– कलानिधीत ७,५०,०००/– वैद्यकीय निधित ५,००,०००/– समाज कल्याण निधीत ५,००,०००/–, शैक्षणिक मदत निधी ५,००,०००/– एकूण ३०,००,०००/– (रुपये तीस लाख फक्त) वर्ग करण्यात आले.

***केटरिंग व्यवस्था*** **:-** १ जानेवारी २०१० ते ३१ डिसेंबर २०१० या कालावधीसाठी "*मयुर केटरर्स*" यांना संपूर्ण केटरिंग, डेकोरेशन व्यवस्थेसाठी ठेकेदारी देण्यात आली.

***उपक्रम आणि कार्यक्रम*** **:-** मंडळाची ६२ वी वसंत व्याख्यानमाला रविवार, दि. १९ एप्रिल २००९ रोजी डॉ. आनंद यादव यांच्या ***साहित्य, समाज आणि संस्कृती*** या विषयावरील उद्घाटनपर व्याख्यानाने सुरु झाली. व्याख्यानमालेचा समारोप रविवार, दि. २६ एप्रिल २००९ रोजी मा. जयराज फाटक यांच्या ***बृहन्मुंबई महानगर पालिके पुढील प्रश्न*** या विषयावरील व्याख्यानाने झाला.

| अ. क्र. | तारीख | कार्यक्रम/ उपक्रमाचे नांव | तपशील |
|---|---|---|---|
| १ | १९ एप्रिल २००९ | व | वक्ते – डॉ. आनंद यादव<br>विषय : साहित्य, समाज आणि संस्कृती |
| | २० एप्रिल २००९ | सं | वक्ते – श्री. गंगाराम गवाणकर<br>विषय : मुंबई ते लंडन व्हाया वस्त्रहरण |
| | २१ एप्रिल २००९ | त | वक्ते – श्री. विनय सहस्त्रबुद्धे<br>विषय : भारतीय लोकशाहीचे भवितव्य |
| | २२ एप्रिल २००९ | व्या | वक्ते – श्रीमती विदया बाळ<br>विषय : स्वेच्छा मरण |
| | २३ एप्रिल २००९ | ख्या | वक्ते – श्री. प्रतिमा जोशी<br>विषय : तुमचा आमचा दहशतवाद |
| | २४ एप्रिल २००९ | न | वक्ते – श्री. भीष्मराज बाम<br>विषय : क्रीडा मानसशास्त्र |
| | २५ एप्रिल २००९ | मा | वक्ते – डॉ. रविन थत्ते<br>विषय : 'आत्मा' ही काय भानगड आहे |
| | २६ एप्रिल २००९ | ला | वक्ते – श्री. जयराज फाटक<br>विषय : बृहन्मुंबई महानगर पालिके पुढील प्रश्न |

| अ. क्र. | तारीख | कार्यक्रम/ उपक्रमाचे नांव | तपशील |
|---|---|---|---|
| २ | २० एप्रिल २००९ | बालनाट्य | *'अप्पू अस्वल्या करी गुदगुल्या'* २५ प्रयोग शुभारंभाचा प्रयोग यशवंत नाट्य मंदिर माटुंगा, रौप्य महोत्सवी प्रयोग श्री. शिवाजी मंदिर प्रमुख पाहुणे मा. श्री. प्रभाकर पणशीकर, मा. श्री. रत्नाकर मतकरी |
| ३ | १५ ते २७ एप्रिल २००९ | बालनाट्य प्रशिक्षण शिबीर | सी. के. पी. एज्युकेशन सोसायटी दादर यांच्या सभागृहात घेण्यात आले. संचालक- श्री. पंकज चेंबुरकर, श्रीमती मृणाल चेंबुरकर |
| ४ | २६ एप्रिल २००९ | स्नेहमेळावा | त्रिकुट निर्मीत *'गोची प्रेमाची'*, तहहयात सभासद, हितचिंतक, देणगीदार, कार्यकर्ते खेळाडू, कलाकार इ. करीता |
| ५ | २२ ते २५ एप्रिल २००९ | मॅटवरील कबड्डी स्पर्धा-जिल्हास्तरीय | मंडळाच्या क्रींडागणावर घेण्यात आली. |
| ६ | १३ ते १४ जून २००९ | विचार मंथन शिबीर मुरबाड | सहभाग-ज्येष्ठ पदाधिकारी, कार्यकारी समिती. |
| ७ | २२ जून २००९ | सांस्कृतिक अमावस्या | अंतरंग थिएटर्स निर्मित दोन अंकी नाटक *'दिसतं तसं नसतं'* |
| ८ | २२ जुलै २००९ | सांस्कृतिक अमावस्या | रचना कलाकेंद्र पुनर्निर्मित दोन एकांकिका |
| ९ | २ ते १६ ऑगस्ट २००९ | नाट्यतंत्र प्रशिक्षण शिबीर | संचालक श्री. दत्ता सावंत, श्री. अभय पैर |
| १० | १५ ऑगस्ट २००९ | स्वातंत्र्यदिन ध्वजारोहण माजी अध्यक्ष कै. म. फडके स्मृती प्रित्यर्थ गुणवंत खेळाडूंचा गुणगौरव | प्रमुख पाहुणे - श्री. चिंतामणी विश्वनाथ नागले, कार्याध्यक्ष-अमर हिंद मंडळ अध्यक्ष - साने गुरुजी रुग्ण सहाय्य ट्रस्ट |
| | | सायकोड्रामा - कार्यशाळा | संचालक : डॉ. अजय ताम्हाणे |
| १० | २२ ऑगस्ट २००९ | सांस्कृतिक अमावस्या | दोन एकांकिका दलाल, रिबाउंड सादरकर्ते अमर हिंद मंडळ कलाविभाग |
| ११ | २६,२७ सप्टेंबर ०९ प्रथम फेरी ९ ऑक्टो अंतिमफेरी | कै. आबा पडते एकांकिका स्पर्धा प्राथमिक फेरी | परीक्षक-श्रीमती मृणाल चेंबुरकर, श्रीमती प्रतिभा पाटील, श्री. मनोहर धोत्रे, श्री. विजय निकम, श्री. सुरेश खरे, श्री. संजय डहाळे, श्रीमती शीतल शुक्ल, प्रमुख पाहुणे - श्रीमती स्मिता तळवलकर सहभागी संख्या-४० |

| अ. क्र. | तारीख | कार्यक्रम/ उपक्रमाचे नांव | तपशील |
|---|---|---|---|
| १३ | १४ नोव्हेंबर २००९ | सांस्कृतिक अमावस्या | मन:शक्ती प्रयोग केंद्र, लोणावळा– तणावमुक्ती, तारुण्यातील महत्वाकांक्षा |
| १४ | १ डिसेंबर २००९ | जागतिक एडस निर्मुलन दिन | दत्ता सावंत लिखित, 'चाहुल उद्याची'–नाट्य अभिवाचन सहभाग–श्रीमती मृणाल चेंबुरकर, श्री. संजय क्षेमकल्याणी, श्री. दत्ता सावंत, श्रीमती अक्षता दळवी, श्रीमती श्रीमती मनाली कुलकर्णी, श्री. चंदन जमदाडे, श्रीमती मेधा वाटवे. |
| १५ | १६ डिसेंबर २००९ | सांस्कृतिक अमावस्या | 'मन माझे' साकव कौन्सीलींग ॲण्ड रिसर्च ऑर्गनायझेशन–वक्ते – डॉ. पुष्कर शिकारखाने, श्रीमती उषा देशपांडे, श्रीमती गिरिजा लिखिते, सुत्रसंचालन – श्रीमती उतरा मोने |
| १६ | १९,२० डिसेंबर २००९ | विचार मंथन शिबीर अर्नाळा | सहभाग – ज्येष्ठ पदाधिकारी, कार्यकारी समिती |
| १७ | २७ डिसेंबर २००९ | कै. उमेश शेणॉय राज्यस्तरीय महाविद्यालयीन वकृत्व स्पर्धा | संयोजक – श्रीमती गीतांजली राणे, श्री. सिद्धार्थ मोकळे, परीक्षक – श्री. पराग पाटील, श्री. सचिन तायडे, श्री. सचिन परब सहभागी स्पर्धक – ३७ |
| १८ | ९ जानेवारी २०१० | आरोग्य सल्ला | हाडांचा ठिसुळपणा – वक्ते डॉ. श्रीधर अर्चिक |
| १९ | १६ जानेवारी २०१० | सांस्कृतिक अमावस्या आरोग्य सल्ला | अस्थमा, क्षयरोग, धूम्रपानाचे दुष्परिणाम वक्ते – डॉ. समीर गर्दे |
| २० | २६ जानेवारी २०१० | प्रजासत्ताकाचे ध्वजारोहण | प्रमुख पाहुणे – ॲड. मुकुंदराव तिवरेकर, विश्वस्त अमर हिंद मंडळ |
| | | रक्तदान, रक्तगट, हिमोग्लोबिन तपासणी टि.टि. इंजेक्शन शिबीर | शुश्रषा हॉस्पिटल डॉ. स्नेहल बिर्जे |
| | | मंडळाचा ६४ वा वर्धापनदिन | वादयवृंद – सूर सम्राट |
| २१ | ८ ते ११ फेब्रुवारी २०१० | आंतरशालेय क्रीडा स्पर्धा खोखो, लंगडी, कबड्डी | प्रमुख पाहुणे – श्री. तुकाराम भोईर, श्री. रामचंद्र जाधव, श्री. अनंत भाताडे पारितोषिक – श्री. आनंद गोखले, श्री. मनोहर इंदुलकर, प्रा. गो. वि. पारगांवकर |

| अ. क्र. | तारीख | कार्यक्रम/ उपक्रमाचे नांव | तपशील |
|---|---|---|---|
| २२ | १३ फेब्रु. २०१० | सांस्कृतिक अमावस्या | गाण्यांचा कार्यक्रम :– 'उर्मी' सादरकर्त्या–श्रीमती उर्मिला भुतकर |
| २३ | ७ मार्च २०१० | आरोग्यसल्ला मोतीबिंदू शस्त्रक्रीया व लेन्स शिबीर | डॉ. माधवी जेस्ते |
| २४ | १५ मार्च २०१० | सांस्कृतिक अमावस्या | भावगीते, नाट्यगीते – सादरकर्त्या श्रीमती अमिता जोशी |

## *अभिनंदनीय - कबड्डी पुरुष*

एप्रिल २००९ ते मार्च २०१० दरम्यान संघाची व खेळाडूंची उल्लेखनीय कामगिरी

१) मुंबई जिल्हा अजिंक्यपद (पुरुष गट)

२) मुंबई जिल्हा किशोर गट उपविजयी (किशोर गट)

३) देवगड, जामसांडे येथे झालेल्या राज्यस्तरीय स्पर्धेत तृतीय क्रमांक व शिस्तबद्ध संघाचे पारितोषिक

## *मुंबई शहर जिल्हा संघात निवड :*

१) सिद्धार्थ गायकवाड (पुरुष गट)

२) केदार गोराटे (किशोर गट)

खालील खेळाडूंनी राज्यस्तरीय तसेच जिल्हा स्तरीय स्पर्धेमध्ये उल्लेखनीय कामगिरी व वैयक्तिक बक्षीसे मिळविली कुणाल यादव, सिद्धार्थ गायकवाड, साईनाथ काळसेकर, केदार गोराटे, अमीत चव्हाण, प्रसाद गुरव, सिद्धेश पायनाईक.

## *कबड्डी - महिला*

साल २००९ एप्रिल २०१० मार्च दरम्यान संघाचा व संघातील खेळाडूंची उल्लेखनीय कामगिरी केली.

| | | | क्रमांक |
|---|---|---|---|
| १) | मुंबई जिल्हा अजिंक्यपद (किशोरी) | – | अजिंक्यपद |
| २) | मुंबई जिल्हा अजिंक्यपद (ज्यू. गट) | – | द्वितीय |
| ३) | मावळी मंडळ, राज्यस्तरीय स्पर्धा | – | उपविजेते |
| ४) | दुर्गामाता सेवा मंडळ (महिला) | – | अजिंक्यपद |
| ५) | विद्या विकास (मॅटवरील) | – | अजिंक्यपद |
| ६) | श्रमिक जिमखाना | – | द्वितीय |
| ७) | शिवशक्ती सेवा मंडळ (महिला) | – | द्वितीय |
| ८) | प्रबोधन ठाकरे | – | द्वितीय |

## खेळाडूंची कामगिरी

**१) दीप्ती पारकर :** दुर्गामाता सेवा मंडळ – स्पर्धेतील उत्कृष्ट खेळाडू, अश्वमेध स्पर्धेसाठी मुंबई विद्यापीठ संघात निवड, साउथ – वेस्ट झोन आंतर विद्यापीठ मुंबई संघात निवड, मुंबई विद्यापीठात अखील भारतीय आंतर विद्यापीठ स्पर्धेसाठी निवड

**२) भक्ती इंदुलकर :** मुंबई जिल्हा कुमारी गटात निवड, अश्वमेध स्पर्धेसाठी मुंबई विद्यापीठ संघात, दुर्गामाता सेवा मंडळ – स्पर्धेसाठी उत्कृष्ट पकड

**३) पूजा पाटील**

१) अखील भारतीय आंतर विद्यापीठ स्पर्धेत मुंबई विदयापीठ संघात निवड

२) विद्या विकास (मॅटवरील) स्पर्धेतील उत्कृष्ठ खेळाडू

**४) अक्षया गोसावी**

१) विद्याविकास सेवा मंडळ – स्पर्धेतील उत्कृष्ट चढाई

२) मुंबई जिल्हा कुमारी गट संघात निवड

**५) प्राजक्ता कांबळी**

१) मुंबई जिल्हा किशोरी गटात निवड

२) कीर्ती कॉलेज आंतर महाविद्यालयीन स्पर्धेत उत्कृष्ट खेळाडूचे बक्षीस

**६) तेजस्विनी पोटे**

१) मुंबई जिल्हा (किशोरी गट) संघात निवड

**खोखो :-**

लोअर परेल येथे झालेल्या २१-११-२००९ चे २४-११-२००९ कालावधी

१) मुंबई जिल्हा अजिंक्यपद व निवड चाचणी खो खो स्पर्धा

किशोर गट :- प्रथम क्रमांक

सर्वोत्कृष्ट अष्टपैलू – केवल महाडेश्वर

मुंबई संघात निवड :- प्रसाद राडिये (कर्णधार), आदेश कागडा, केवल महाडेश्वर, शुभम साळवी

किशोरी गट :- द्वितीय क्रमांक

सर्वोत्कृष्ट सरंक्षक :- मधुरा पेडणेकर

मुंबई संघात निवड :- भक्ति राडिये (उपकर्णधार), मधुरा पेडणेकर, प्राची सुर्वे

२) श्रीवर्धन येथे झालेल्या (मुली गट) राज्य अजिंक्यपद स्पर्धेत मुंबई संघात त्रिवेणी चव्हाण हिची निवड, तसेच मुंबई संघाचे व्यवस्थापक म्हणून श्री. प्रफुल्ल पाटील

३) सचिन भाऊ अहीर, आमदार चषक (महिला विभाग) :- तृतीय क्रमांक (विभागून) (२२/४/२०१० ते २५/४/२०१०) कालावधी

४) निकेश धुरी ह्यांची मुंबई विद्यापीठ संघात निवड

## *कलाविभाग :-*

शांता जोग करंडक – श्री. दिलीप सकपाळ – लोचट, उंबरठा एकांकिका स्पर्धा – कु. मनाली कुलकर्णी – फेस व्हॅल्यु, रचना कलाकेंद्र – उत्तेजनार्थ एकांकिका – वाचनीय

## *वैयक्तिक अभिनय स्पर्धा :-*

अभिनय सम्राट २०१० प्रथम पारितोषिक कु. शंतनु रांगणेकर – एकता कल्चरल सेंटर, घाटकोपर, इंद्रधनु बोरीवली – अभिनय उत्तेजनार्थ – विक्रम सोनावणे, संदिप मालगुंडकर, अनिकेत वायदंडे

## *विशेष अभिनंदन :-*

मुंबई खोखो संघटनेतर्फे याच वर्षापासून सुरु केलेला "एकनाथ साटम" ज्येष्ठ कार्यकर्ता पुरस्कार उपाध्यक्ष ***रमेश वरळीकर*** यांना मिळाला.

## *इतर संकीर्ण:-*

- अहवाल काळात सभागृह मैदान यांची निगा राखण्यासाठी आवश्यक कामे करुन घेण्यात आली.
- अहवाल काळात कर्मचाऱ्यांना वेतनवाढ देण्यात आली.
- प्रतिवर्षाप्रमाणे स्वातंत्र्यदिनी माजी अध्यक्ष कै. मधुकर ज. फडके यांच्या स्मरणार्थ गुणवंत विद्यार्थ्यांना बक्षिस देऊन गौरविण्यात आले.
- प्रतिवर्षाप्रमाणे तहह्यात सभासद, आजी माजी खेळाडू हितचिंतक यांना दिवाळीची भेटकार्डे मंडळाच्या वतीने पाठविण्यात आली.
- खेळाडूंना, कर्मचाऱ्यांना गणवेश देण्यात आले.
- राज्यपातळीवर तसेच राष्ट्रीय पातळीवर जिल्ह्याचे, राज्याचे प्रतिनिधित्व करणाऱ्या मंडळाच्या खेळाडूंना अनुक्रमे ५००/– व १०००/– रुपये अनुदान देण्याच्या निर्णयाप्रमाणे अनुदान सुरु ठेवण्यात आले आहे.
- खेळाडू, कलाकार यांना ट्रॅकसूट तसेच स्पोर्टस शूज देण्यात आले.
- इंडियन असोसिएशन फॉर दि हेण्डीकॅप या संस्थेला १५००/– रुपये देणगी देण्यात आली.
- नॅशनल सोसायटी फॉर दि ब्लाईंड या संस्थेला १०००/– रुपये देणगी देण्यात आली.
- मतदान नोंदणी कामासाठी निवडणूक कर्मचाऱ्याची तात्पुरती बैठक व्यवस्था करण्यात आली.
- *खालील संस्थांना व्यक्तींना विनामूल्य / सवलतीच्या दरात सभागृह देण्यात आले.*

  १) दादर अचलगाचा – प्रार्थना, प्रवचन

  २) कंझ्युमर गायडन्स सोसायटी ऑफ इंडिया – स्नेहमेळावा

  ३) सी. के. पी. एज्युकेशन – सी. डी. देशमुख विचारमंच – 'पाणी पेटलं' परिसंवाद

  ४) महाराष्ट्र कबड्डी असोसिएशन – कबड्डी दिन

  ५) दादर जैन पौषद शाळा – प्रार्थना, प्रवचन

  ६) महाराष्ट्र महिला महापंचायत – स्नेहमेळावा

## समारोप :-

मंडळाचे विश्वस्त, अध्यक्ष, उपाध्यक्ष यांनी मंडळाच्या कार्यासाठी, कार्यक्रम उपक्रमांसाठी वेळोवेळी मौल्यवान मार्गदर्शन केले हे नमूद करताना आम्हाला अत्यंत आनंद होत आहे.

मंडळाचे क्रीडाविभाग प्रमुख श्री. दीपक पडते क्रीडाविभागाची जबाबदारी समर्थपणे पेलीत आहेत. त्यांच्या मार्गदर्शनाखाली श्री. विजय राणे कबड्डीचे तर श्री. प्रफुल्ल पाटील, श्री. संजय पेडणेकर, खोखो तसेच श्री. निकेश धुरी, श्री. अमित संत, श्री. जतिन टाकळे, श्री. निलेश सावंत हे व अन्य खोखोचे प्रशिक्षक म्हणून दैनंदिन सराव घेत आहेत. कलाविभागाची जबाबदारी कलाविभाग प्रमुख श्री. दत्ता सावंत यांनी योग्य प्रकारे सांभाळली असून त्यांच्या मार्गदर्शनाखाली अनेक नवीन कलाकार, कार्यकर्ते तयार होत आहेत.

अनेक वर्ष सातत्याने मंडळाचा हिशोब चोख ठेवणारे श्री. गणेश मोंडकर यांचे मंडळ आभार व्यक्त करीत आहे. मंडळाच्या लिपीक श्रीमती स्नेहा तेंडुलकर, कर्मचारी श्री. संदीप चांदे यांचे दैनंदिन कामकाजात तसेच वेळोवेळी होणाऱ्या कार्यक्रम उपक्रमांत योग्य सहकार्य मिळत आहे. मयुर कॅटरर्सचे श्री. अविनाश पाटील, श्री. मयुर पाटील यांचे वेळोवेळी होणाऱ्या कार्यक्रमांत व उपक्रमात मिळणाऱ्या सहकार्याबद्दल आभार व्यक्त करीत आहोत.

तहहयात सभासदांसाठी व त्यांच्या कुटुंबियांसाठी शिवाजी मंदिर येथे आयोजित स्नेहमेळाव्यात मराठी रंगभूमीवर ५००० विक्रमी प्रयोग केलेल्या '*वस्त्रहरण*' या व्यावसायिक नाटकाच्या प्रयोगाला सभासदांनी दिलेला प्रतिसाद उत्साहवर्धक होता. शिवाजी मंदिर येथे आयोजित केलेल्या स्नेहमेळाव्याला सभासदांनी दिलेल्या प्रतिसादामुळे आमचा उत्साह वाढला आहे.

वसंत व्याख्यानमाला, आरोग्य सल्ला, वकृत्व स्पर्धा, बालनाटयशिबीरे या कार्यक्रमाद्वारे आगामी वर्षातील भरघोस कार्यक्रमांची सुरुवात झालेली आहे. पुढील वर्षभरात अनेक उपक्रम, कार्यक्रम होणार आहेत. सर्व तहहयात सभासदांनी या कार्यक्रमांचा लाभ घ्यावा.

अमर हिंद मंडळासमोरील रस्त्याला "अमर हिंद मंडळ मार्ग" असे नाव देण्याचा प्रस्ताव मुंबई महानगरपालिकेने समंत केला असून लवकरच समारंभ पूर्वक नामकरण होणार आहे. या निमित्ताने मुंबई महानगरपालिकेचे तसेच सर्व माननीय नगर सेवकांचे आभार व्यक्त करीत आहोत.

अमर हिंद मंडळाचा कार्यभार सांभाळण्यासाठी, तसेच कार्यक्रमांचे प्रमाण वाढलेले असतानाही ते आयोजित करण्यासाठी सर्व पदाधिकारी, समिती सदस्य, खेळाडू, कलाकार, कार्यकर्ते वेळोवेळी सहकार्य करीत असतात. त्यांच्या सहकार्याचा मी विनम्रपणे उल्लेख करीत आहे.

अहवाल कालावधीत आयोजित केलेल्या कार्यक्रमांत सहभागी होऊन सभासदांनी दिलेले सहकार्य तसेच मंडळाचे कर्मचारी, कार्यकर्ते, हितचिंतक, कलाकार, खेळाडू यांनी दिलेले सहकार्य याचा कृतज्ञता

पूर्वक उल्लेख करुन आणि पुढील वाटचालीत या सर्वांचे सहकार्य मिळेल अशी सदिच्छा व्यक्त करुन हा अहवाल समाप्त करीत आहे.

कळावे लोभ असावा आणि तो वृद्धिंगत व्हावा ही विनंती.

कार्यकारी समितीच्या अनुमतीने
अरुण अ. देशपांडे
कार्यवाह

## श्रद्धांजली

अहवाल काळात निधन पावलेल्या मंडळाच्या ज्ञातअज्ञात सभासद, हितचिंतक, कार्यकर्ते यांना अमर हिंद मंडळाची भावपूर्ण श्रद्धांजली

## (परिशिष्ट 'अ')

## कार्यकारी समितीच्या १ एप्रिल २००९ ते ३१ मार्च २०१०

## सभा उपस्थितीची माहिती

## एकूण सभा ११

| | | | |
|---|---|---|---|
| १) | श्री. चिंतामणी नागले | (कार्याध्यक्ष) | ११ |
| २) | श्री. दीपक पडते | (कार्योपाध्यक्ष) | १० |
| ३) | श्री. अरुण देशपांडे | (कार्यवाह) | ११ |
| ४) | श्री. सतीश रेडीज | (सहकार्यवाह) | ०९ |
| ५) | श्री. श्रीकृष्ण राणे | (कोषाध्यक्ष) | ११ |
| ६) | श्री. संजय पेडणेकर | (सदस्य) | १० |
| ७) | श्री. विजय राणे | (सदस्य) | ११ |
| ८) | श्री. दत्ता सावंत | (सदस्य) | ११ |
| ९) | श्री. प्रफुल्ल पाटील | (सदस्य) | ११ |
| १०) | श्रीमती नीलिमा पालकर | (सदस्य) | ०१ |
| ११) | श्रीमती सीमा कोल्हटकर | (सदस्य) | ०७ |
| १२) | श्री. दीपक नाडकर्णी | (सदस्य स्वीकृत) | १० |
| १३) | श्री. विलास कारेकर | (सदस्य स्वीकृत) | ०८ |



मुंबई खोखो संघात निवड झाल्याबद्दल कु. मधुरा पेडणेकर हिचे कौतुक करताना
मंडळाचे विश्वस्त श्री. दिनकरराव पाटील, ॲड. मुकुंदराव तिवरेकर




मंडळाचे माजी कार्यवाह कै. उमेश शेणॉय यांच्या स्मरणार्थ आयोजित
महाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धा संयोजक श्रीमती गीतांजली राणे यांना सन्मानित
करताना कार्यकारी समिती सदस्य श्री. विजय राणे




मंडळाचे माजी कार्यवाह आबा पडते यांच्या स्मरणार्थ आयोजित कै. आबा पडते राज्यस्तरीय मराठी एकांकिका स्पर्धा – पारितोषिक वितरण समारंभ प्रमुख पाहुण्या – श्रीमती स्मिता तळवलकर, परीक्षक – श्री. संजय डहाळे, श्रीमती शितल शुक्ल आणि मंडळाचे पदाधिकारी




मंडळाच्या सुप्रसिद्ध वसंत व्याख्यानमालेचे उद्‌घाटक डॉ. आनंद यादव यांना सन्मानित करताना मंडळाचे कार्याध्यक्ष मा. श्री. चिंतामणी नागले, कार्यवाह मा. श्री. अरुण देशपांडे